**मा. हरित लवादाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्टयातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force) दि. १०/०७/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता एन.आय.सी. सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त :**

देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांबाबत दिनांक. १७/०१/२०१८ रोजी दैनिक "द हिंदू" मध्ये प्रसिध्द वृत्ताच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवाद दिल्ली यांनी मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करुन घेण्यात आला होता. मा. लवादाने सदर प्रकरणी दिनांक. २९/०९/२०१८ रोजी आदेश पारित करताना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्टयांचे वर्गीकरण प्राथम्य क्र. १ ते ५ प्रकारामध्ये केले आहे. त्यामध्ये राज्यातील एकूण ५३ प्रदूषित पट्टयांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदूषित पट्टयांमधील ९ प्रदूषित पट्टे प्रथम्य क्र. १, ६ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. २, १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्रमांक ३, १० प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. ४ व १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. ५ मध्ये समाविष्ट आहेत. मा. हरित लवाद, दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशांनुसार राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांच्या पट्टयांमधील प्रदूषण कमी करण्याकरिता कृति आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी करण्याकरिता नदी पुनरुत्थान समिती, पर्यावरण सनियंत्रण कार्यदल नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन खालील प्रमाणे आदेशित केले आहे.

मा. हरित लवादाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्टयातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (**Special Environment Surveillance Task Force**) ची स्थापना प्रदूषण पट्टे असलेल्या जिल्हयाची करावयाची असल्याचे आदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने खालील विशेष कृती दलाची समिती गठीत करण्यात आली :-

| अ.क्र. | कृती दलाचे सदस्य | सदस्य |
|---|---|---|
| १ | जिल्हा दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी | श्रीमती. भाग्यश्री जोशी,<br>जिल्हा खनिकर्म अधिकारी, |
| २ | जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रतिनिधी | श्री. भागवत फुंदे,<br>पोलीस निरिक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय, औरंगाबाद. |
| ३ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा त्यांचे प्रतिनिधी (उप-प्रादेशिक अधिकारी) | श्री. प्रदिप द. वानखेडे,<br>उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद. |
| ४ | विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने जिल्हा न्यायाधीश यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी | श्री. एम.डी. इंदाळकर,<br>सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, औरंगाबाद. |

तसेच सदर बैठकी दरम्यान खालील तांत्रिक सदस्य उपस्थित होते :-

| अ.क्र. | उपस्थित तांत्रिक सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | श्री.जयंत कदम | उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ |
| २ | श्री. रविंद्र जाधव | क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद. |

प्रथमत: उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद यांनी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (**Special Environment Surveillance Task Force**) बैठकी दरम्यान सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन मा. राष्ट्रीय हरित लवाद दिल्ली यांनी मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करुन घेण्यात

...२

आल्या बाबत व मा. हरित लवाद यांनी सदर प्रकरणी दिनांक. २९/०९/२०१८ रोजी आदेश व राज्यातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांबाबत कृति आराखडा राबविण्याबाबत नदी पुनरुत्थान समितीची स्थापना करण्याबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८ च्या शासन निर्णयाबाबत समितीने करावयाच्या कामाकाजाची व त्यांच्या कार्यकक्षे बाबत माहिती सर्व उपस्थितांना अवगत करुन दिली.

श्रीमती. भाग्यश्री जोशी, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगितल्यानुसार व यादी पुरविल्यानुसार सन-२०१८-२०१९ या कालावधीकरिता पैठण तालुक्यातील गोदावरी नदीत एकूण १२ वाळू पट्टे प्रस्तावीत केलेले असून सदर वाळू घाटांपैकी एक वाळू घाट हा समृध्दी महामार्गाच्या कामासाठी राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समितीकडे **(SEAC)** मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहेत व मागिल २ वर्षापासून गोदावरी नदी पात्रात पाणी असल्याने तसेच संक्शन पंप वापरास बंदी असल्यामुळे कुठल्याही वाळू पट्टयांचा लिलाव झाले नसल्याचे सांगितले यापुढे वाळू पट्टयाबाबत शासन निर्णयाला अधिन राहून निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

सदर बैठकी दरम्यान सर्व सदस्यांमार्फत शासन निर्णय दि. १३/१२/२०१८ रोजीच्या निर्णयानुसार स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाने करावयाच्या कार्यवाही बद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच पुढील कामकाजा करीता कृती आराखडा तयार करुन कामकाज करण्याचे ठरविण्यात आले व स्वतंत्र पर्यावरण संनियंत्रण दलाचे काम प्रभाविपणे राबविण्याकरिता निमंत्रित सदस्य म्हणून तहसिलदार, पैठण व मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण यांना सदर समितीमध्ये निमंत्रीत सदस्य म्हणुन समाविष्ट करणेबाबत ठरविण्यात आले.

तसेच सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निमंत्रीत सदस्यांना समितीमध्ये समाविष्ट करण्याविषयीचे पत्र देण्यात यावे व यापुढील बैठक ही दि. २५/०७/२०१९ रोजी निमंत्रित सदस्य यांच्या समवेत घेण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानुन बैठक संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

(प्रदीप वानखेडे)
उप-प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
औरंगाबाद.

**(श्रीमती. भाग्यश्री जोशी)**
मा. जिल्हा दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी
जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद.

(अनिल शा. मोहेकर)
प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
औरंगाबाद.